**महानगरपालिका अमरावती,**

महिला व बाल विकास विभाग

---

जा.क्र. अमनपा / मबावि / 231 / 2024 दिनांक 4 / 10 / 2024

**कोटेशन नोटीस**

महिला व बाल विकास विभाग, महानगरपालिका, अमरावती यांचे कडून खालील कामाकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्यानुसार खालील काम करावयाचे आहे. त्याकरीता संबंधीत कार्य करणाऱ्यांनी दरपत्रक मोहोर बंद लिफाफयामध्ये ( कोटेशन ) दि. 10 / 10 /2024 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करावे. प्राप्त कोटेशन शक्य झाल्यास त्याच दिवशी उघडण्यात येईल.तसेच कुठलेही कारण न देता एक किंवा सर्व कोटेशन नाकारणे , स्वीकारणे यांचे अधिकार खाली सही करणार अधिकारी यांचेकडे राखीव ठेवण्यात येत आहे.

| क्र | कामाचे नाव | शेरा |
|---|---|---|
| 1 | स्पर्धा परीक्षा ग्रंथालय / अभ्यासीका येथे विवीध विषयांचे शिकवणी वर्ग घेणे | प्रती वर्ग ( 45 मिनीटांचा तास ) यानुसार दर सादर करावे . |

अटी व शर्ती :-

- वरील कामाकरीता त्या संबंधीत संस्था / एजन्सी यांनीच दरपत्रक द्यावे.
- दरपत्रक सादर करणारी संस्था नोंदणीकृत असावी ( शॉप अक्ट किंवा संस्था नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक )
- दरपत्रक सादर करतेवेळी संस्था / फर्म यांनी पॅनकार्ड , आधारकार्ड जोडणे बंधनकारक राहिल.
- दर सर्व खर्च व करांसह द्यावे. ज्यात लागु असलेले सर्व शासकीय करांचा समावेश असावा.
- MPSC / UPSC व इतर स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करण्याकरीता सदर दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्यामुळे संबंधीत विषयांचे तज्ञ ( किमान पदव्युत्तर पदवी रता धारक ) असणे आवश्यक राहिल. त्यानुसार व्यवस्था करणे आवश्यक राहिल.
- मनपा आदेशीत करेल त्या संख्येत व मुदतीत काम करणे दरपत्रकधारकास बंधनकारक राहित.
- कार्य झाल्यानंतर देयक अदा करण्यात येईल. आवश्यक असल्यास तांत्रीक तपासणी करण्यात येईल.
- कोणत्याही कारणास्तव देयक अदा होण्यास विलंब झाल्यास मनपा व्याज देणार नाही.
- अटी असलेले दरपत्रक अपात्र असतील.
- मुदतीनंतर प्राप्त दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणे तसेच योजना राबविणे बाबातचे सर्वाधिकार मा. आयुक्त यांचेकडे राखीव आहेत.
- अधिक मांहितीकरीता महिला व बालविकास विभाग , मनपा अमरावती येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

उपायुक्त सा
महानगरपालिका अमरावती

महिला व बाल विकास अधिकारी
महानगरपालिका अमरावती

प्रतिलीपी- सिस्टीम मैनेजर मनपा, अमरावती यांना मनपा पोर्टलवर नोटीन प्रसिद्ध करण्याकरीता